जाहिरात

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००८ यांचे कार्यालय

जाहिरात क्रमांक-आस्था/ई-५/सरळसेवा भरती/२०१७ पुणे दिनांक: /१०/२०१७

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक एटीएम ०३१६/प्र.क्र./२१५/पोल-४, दिनांक २६/१०/२०१६ व महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.एफपीबी-०७१६/प्र.क्र.३०८/पोल-४, दि.१८.०२.२०१७ अन्वये मान्यता दिलेनुसार अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिपत्याखालील गट क संवर्गातील तपासणीस /पोलीस उपनिरीक्षक (अंमु) यांची ४७ व सहा.शासकीय दस्तऐवज परिक्षक यांची १० रिक्त पदे सरळसेवेने भरावयाची असून त्यासाठी मागासवर्गीय / खुला प्रवर्गातील इच्छुक व अर्हताप्राप्त उमेदवाराकडुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. भरावयाच्या पदांचा तपशिल खालील प्रमाणे

| जाहिरात क्रमांक | पदानाम | एकुण पदसंख्या | पे बॅड (रुपये) | ग्रेड पे (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १. | तपासणीस / पोलीस उप निरीक्षक (अंमुकें) | ४७ | ९३००-३४८०० | ४३०० |
| १. | सहा.शासकीय दस्तऐवज परिक्षक | १० | ९३००-३४८०० | ४२०० |

उपरोक्त संवर्ग पदांच्या भरतीबाबतचे नियम, अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संकेतस्थळ www.mahacid.com व महाऑनलाईन या संस्थेच्या https://maharecruitment.mahaonline.gov.in संकेत स्थळावर वर उपलब्ध करुन दिलेले आहेत ते उमेदवाराना लागु राहतील. वरील नमुद पदांच्या, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, अनुभव व शारिरीक पात्रता या बाबतच्या अटी व शर्ती जाहिरातीमधील संबंधित पदांच्या खाली दर्शविण्यात आलेल्या आहेत

नमुद संवर्ग पदांची निवड प्रक्रिया ही ऑनलाईन परिक्षा पध्दतीने घेण्यात येणार असुन त्याबाबतचा दिनांक व वेळ उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल, जाहिरातीमधील नमुद अटींची पूर्तता करणारे उमेदवार खालील विहित दिंनाकाचे मुदतीत ऑनलाईन पध्दतीने आवदेन अर्ज, परिक्षा शुल्कासह भरु शकतात

अ) ऑनलाईन आवेदन अर्ज सुरु होण्याचा दिनांक :- दि.१५.११.२०१७

ब) ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक :- दि.१४.१२.२०१७

क) ऑनलाईन पध्दतीने परिक्षा शुल्क भरता येऊ न शकाणा-या उमेदवारांकरिता भारतीय भारतीय स्टेट बॅकेत चलनाव्दारे शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक १५.१२.२०१७ (बॅकेच्या निर्धारित वेळेमध्ये) देय परिक्षा शुल्कासोबत बॅकेच्या नियमानुसार अतिरिक्त सेवाशुल्क देय राहील.

Scanned by CamScanner

## भरती करावयाचे पदे :-

### १ ) पदाचे नाव :- तपासणीस/ पोलीस उप निरीक्षक, (अंमु) :-

(पे बॅड :- रुपये ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४३००), एकुण पदे :- ४७

**समांतर आरक्षण तक्ता**

| सामाजिक आरक्षण | अ.जा. | | अ.ज. | | विजाअ | | भज-ब | | भज-क | | भज-ड | | विमाप्र | | इ.मा.व. | | खुला | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भरावयाची रिक्त पदे | ०६ | | ०३ | | ०२ | | ०१ | | ०२ | | ०१ | | ०१ | | ०९ | | २२ | | ४७ |
| कप्पीकृत आरक्षण | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म | |
| सर्वसाधारण | २ | ० | २ | ० | १ | ० | १ | ० | १ | ० | १ | ० | १ | ० | ४ | ० | ८ | ० | २१ |
| महिला ३०% | ० | २ | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ३ | ० | ७ | १५ |
| खेळाडू ५ % | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | १ | | १ |
| प्रकल्पग्रस्त ५ % | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | १ | | १ |
| भुकंपग्रस्त २ % | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० |
| माजीसैनिक १५% | १ | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | १ | | ३ | | ५ |
| अंशकालीन पदविधर १०% | १ | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | १ | | २ | | ४ |

तपासणीस /पोलीस उपनिरीक्षक (अंमु) पदाकरिता समांतर आरक्षण नमुद तक्त्यानुसार लागु राहील, तक्त्यामध्ये दर्शविलेली पदे व त्यानूसार आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे. या पदावरील नियुक्ती ही खालील अर्हता धारण करणा-या उमेदवारांमधुन नामनिर्देशनाने करण्यात येईल. महिला आरक्षण हे शासन निर्णय दि.२५/०५/२००१ मधील सुचनांनुसार भरण्यात येईल.

**अ) तपासणीस / पोलीस उपनिरीक्षक(अंमु) ही पद भरती**

१. पोलीस दलामध्ये कार्यरत लिपीक अथवा चिफ ऑपरेटर म्हणून कार्यरत कर्मचा-यामधून

२.शासकीय सेवेमध्ये नसलेल्या इसमांमधून

३.पोलीस दलामध्ये कार्यरत असलेल्या पोलीस शिपाई ते सहा.पोलीस उपनिरीक्षक दर्जापर्यंतचे कर्मचा-यामधून करण्यांत येईल.

**ब) वयोमर्यादा :-** i) खुला प्रवर्गाकरिता अर्ज स्विकृती दिनांक रोजी वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षे पेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीय प्रवर्गाकरिता उच्चतम वयोमर्यादेत ०५ वर्षे सवलत अनुज्ञेय राहील.

ii) माजी सैनिकांसाठी सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ०३ वर्षे इतकी राहील

iii) भुकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवार यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील.

iv) अंशकालीन कर्मचारी उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे राहील.

v) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शा.नि. दि. ०१/०७/२०१६ नुसार कोणत्याही प्रवर्गाच्या उमेंदवरांची उच्चतम वयोमर्यादा ४३ राहील.

Scanned by CamScanner

क) शैक्षणिक अर्हता :- i) शासन निर्णय दिनांक २८.०८.१९८५ नुसार कोणत्याही शाखेतील पदवीधर
ii) महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले संगणक हाताळणी बाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

ड) शारिरीक पात्रता :- सुदृढ शरीरयष्टी व निर्दोष दृष्टी आवश्यक . महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय दिनांक २७.०५.२००८ नुसार अपंगाना अपात्र ठरविण्यांत आलेले आहे.

**२ ) पदाचे नाव :- सहा.शासकीय दस्तऐवज परिक्षक , सरळसेवा भरती**

(पे बॅंड :- रुपये ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४२००), एकुण पदे :- १०

**समांतर आरक्षण तक्ता**

| सामाजिक आरक्षण | अ.जा. | | अ.ज. | | विजाअ | | भज-ब | | भज-क | | भज-ड | | विमाप्र | | इ.मा.व. | | खुला | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भरावयाची रिक्त पदे | ०२ | | ०२ | | ०१ | | ०१ | | ०० | | ०० | | ०० | | ०० | | ०४ | | १० |
| कप्पीकृत आरक्षण | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म | |
| सर्वसाधारण | १ | ० | १ | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ६ |
| महिला ३०% | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ |
| खेळाडू ५ % | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० |
| प्रकल्पग्रस्त ५ % | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० |
| भुकंपग्रस्त २ % | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० |
| माजीसैनिक १५% | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | १ | | १ |
| अंशकालीन पदविधर १०% | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० | | ० |

सहा.शासकीय दस्तऐवज परिक्षक पदाकरिता समांतर आरक्षण नमुद तक्त्यानुसार लागु राहील, तक्त्यामध्ये दर्शविलेली पदे व त्यानूसार आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे. या पदावरील नियुक्ती ही खालील अर्हता धारण करणा-या उमेदवारांमधुन नामनिर्देशनाने करण्यात येईल. महिला आरक्षण हे शासन निर्णय दि.२५/०५/२००१ मधील सुचनांनुसार भरण्यात येईल.

अ)वयोमर्यादा :- i) खुला प्रवर्गाकरिता अर्ज स्विकृती दिनांक रोजी वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षे पेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीय प्रवर्गाकरिता उच्चतम वयोमर्यादेत ०५ वर्षे सवलत अनुज्ञेय राहील.
ii) माजी सैनिकांसाठी सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ०३ वर्षे इतकी राहील
iii) भुकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवार यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील.
iv) अंशकालीन कर्मचारी उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे राहील.
v) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शा.नि. दि. ०१/०७/२०१६ नुसार कोणत्याही प्रवर्गाच्या उमेंदवरांची उच्चतम वयोमर्यादा ४३ राहील.

Scanned by CamScanner

ब) शैक्षणिक अर्हता :- i) रसायनशास्त्र मुख्य विषय आणि भौतिकशास्त्र उप विषय घेवुन मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदवीधर.

ii) महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले संगणक हाताळणी बाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

क) प्राधान्यशिल अर्हता :- ज्या उमेदवाराना छायाचित्रणातील ज्ञान, विधी शाखेतील पदवी धारण केलेली आहे किंवा मोडी लिपी, उर्दू, आणि गुजराथी या भाषेमधील लेखन व वाचन यांचे ज्ञान प्राप्त केले आहे.

ड)शारिरीक पात्रता :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय दिनांक २७.०५.२००८ नुसार अपंगाना अपात्र ठरविण्यांत आलेले आहे.

**खालील अटी व शर्ती या दोन्ही पदांकरिता समान आहेत.**

३. उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) असणे आवश्यक आहे.सदर प्रमाणपत्र अर्ज भरण्या तारखेपुर्वीचे असणे आवश्यक आहे.

४. आर्थिक निकषाबाबतचे तत्व (क्रिमेलिअर) लागू करण्यात आलेल्या (इमाव. विजाअ,भजब,-क-ड, व विमाप्र) उमेदवारांना उन्नत व प्रगत वर्गात मोडत नसल्याचे दिनांक १/४/२०१६ ते ३१/३/२०१७ या वित्तीय वर्षाचे सक्षम प्राधिकरणाने निर्गमीत केलेले दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंतचे रोजीचे अथवा पुढील वित्तीय वर्षाचे नॉन क्रिमेलिअर प्रमाणपत्र आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्र अर्ज भरण्या तारखेपुर्वीचे असणे आवश्यक आहे.

५. महिलांना ३० टक्के आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी उन्नत व प्रगत वर्गात मोडत नसल्याचे चालु वर्षाचे दिनांक ०१/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७ अथवा पुढील वित्तीय वर्षाचे सक्षम प्राधिकारणाने निर्गमित केलेल्या ३१/०३/२०१८ पर्यंतचे किंवा पुढील वित्तीय वर्षाचे नॉन क्रिमेलिअर प्रमाणपत्र आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्र अर्ज भरण्या तारखेपुर्वीचे असणे आवश्यक आहे.

६.प्रकल्पग्रस्त / भुकपगस्त/ खेळाडु /अशंकालीन पदवीधर / माजी सैनिक हे उमेदवार एकाचवेळी दोन समांतर आरक्षणाचा लाभ देण्याबाबतची नोंद अर्जात करतात. अशा उमेदवाराना एकाच संमातर आरक्षणाचा लाभ देय असल्याने समातंर आरक्षणाकरिता प्राथम्यक्रम उमेदवाराने निश्चित करावा.

७.अर्ज महाऑनलाईन च्या अधिकृत केद्रांवरसुध्दा भरता येईल. आवश्यक माहिती उपरोक्त नमूद संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

७.१ जे शासकीय कर्मचारी सदर भरतीकरिता ऑन लाईन अर्ज करणार असतील त्यांनी प्रथम त्यांचे घटक / विभाग प्रमुखांची परवानगी घेउन त्याची प्रत ऑन लाईन अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

**८.परिक्षा शुल्क :-**

| जाहिरात क्रमांक | पदाचे नावं | खुला प्रवर्ग | मागास प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | तपासणीस/पोलीस उप निरीक्षक | ६०० | ५०० |
| १ | सहा.शासकीय दस्तऐवज परिक्षक | ६०० | ५०० |

**सदरचे परिक्षा शुल्क ना-परतावा आहे.**

Scanned by CamScanner

टिप :- माजी सैनिक यांचेकरिता कोणतेही परिक्षाशुल्क लागु नाही.

९. अर्जदारांकरीता सर्वसाधारण सुचना :-

१) निवड प्रक्रिया :-

अ) i) अर्हताप्राप्त उमेदवार ऑनलाईन परिक्षेकरिता पात्र राहतील. सदर लेखी परिक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची असेल. प्रत्येक प्रश्नास अधिकाधिक २ गुण ठेवण्यात येतील. परिक्षेचे माध्यम मराठी राहील. यामध्ये मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरिता १२० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

ii) निरीक्षण चाचणी ८० गुणांची असेल, सदर निरीक्षण चाचणी करीता काही वस्तुचे काही मिनिटात निरीक्षण करुन पुढील काही मिनिटात त्या वस्तुंची नांवे उत्तर पत्रीकेत नोंदवावयाची आहेत. प्रत्येक वस्तुच्या नोंदीसाठी समान गुण असतील.चाचणी परिक्षेत पात्र होण्यासाठी लेखी परीक्षेत किमान ५० टक्के गुण मिळविणे आवश्यक राहील.

iii) लेखी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी पध्दतीची परिक्षा कालावधी ९० मिनीटांचा असेल.

iv) उपरोक्त नमूद संकेतस्थळावर उमेदवारांकरिता ऑनलाईन परिक्षेचे स्वरुप समजणेकरिता सराव चाचणी चा पर्याय उपलब्ध करुन देण्यात येईल.

ब) गुणवत्ता प्राप्त उमेदवाराना आरक्षण व रिक्त पदानुसार प्रमाणपत्र पडताळणीसाठी बोलवण्यात येईल. या बाबतची माहिती उपरोक्त संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

क) मुलाखत:- साप्रवि, शासन निर्णय क्र. प्रानिम १२१४/प्र.क्र.(४३/१४)/१३-अ, दि. ५/६/२०१४ अन्वये मुलाखत प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे.

१०. लेखी परिक्षेमध्ये उच्चगुण प्राप्त उमेदवारामधून शा.नि. दिनांक १९/१०/२००७ नुसार रिक्त पदांच्या संख्येच्या ३ पटीत उत्तीर्ण उमेदवारांची गुणानुक्रमानुसार यादी तयार करण्यांत येईल. सदर यादी या कार्यालयाचे संकेतस्थळ www.mahacid.com व महाऑनलाईन या संस्थेच्या https://maharecruitment. mahaonline.gov.in संकेतस्थळावर पुढील कामकाजाचे सात दिवसांत प्रसिध्द करण्यांत येईल. नमुद गुणवत्ता धारक उमेदवारांना निरीक्षण चाचणीकरिता पाचारण करण्यांत येईल. लेखी परिक्षेचे गुण व निरीक्षण चाचणीचे गुण एकत्रित करुन प्राप्त गुणांनुसार व प्रवर्गानिहाय अंतिम निवड यादी तयार करण्यांत येईल. केवळ सदर यादीमधील पात्र उमेदवारांनी लेखी परीक्षेचे वेळी प्राप्त झालेले प्रवेशपत्र व स्वत:चे शासन अधिकृत ओळखपत्र, सर्व मुळ (original) प्रमाणपपत्रे घेवून प्रमाणपत्र पडताळणी करीता हजर रहावे.

Scanned by CamScanner

११. तपासणीस /पोलीस उपनिरीक्षक (अंमु) यांना लागू :-

नेमणुक झालेल्या उमेदवारांना एक वर्ष कालावधीचे तपासणीस / पोलीस उपनिरीक्षक(अंमु) या पदाचे प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षण कालावधी पुर्ण झाल्यानंतर तपासणीस /पोलीस उपनिरीक्षक(अंमु) पदाची खात्यांर्गत परीक्षा घेण्यात येईल त्यामध्ये अनुत्तीर्ण होणा-या उमेदवारांची पुन्हा सहा महिन्यांनी दुसरी संधी देवुन परिक्षा घेण्यात येईल त्यामध्ये त्यास उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील अन्यथा सदर दिड वर्ष कालावधीमध्ये उत्तीर्ण न झालेल्या उमेदवारास या सेवेतून कमी करण्यांत येवून प्रशिक्षणाचा खर्च उमेदवाराकडून वसुल करण्यांत येईल. परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना नेमणुकीचे दिनांकापासून चार वर्षाचे आत एनसीआरबी, नवी दिल्ली येथे घेण्यात येणारी तपासणीस/सर्चर परिक्षा पास होणे अनिवार्य राहील.

१२. सहा.शासकीय दस्तऐवज परिक्षक यांना लागू :-

सहा.शासकीय दस्तऐवज परिक्षक म्हणून नेमणुक झालेल्या उमेदवारांना एक वर्ष कालावधीचे प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षण कालावधी पुर्ण झाल्यानंतर सहा.शासकीय दस्तऐवज परिक्षक पदाची खात्यांर्गत परीक्षा घेण्यात येईल त्यामध्ये अनुत्तीर्ण उमेदवारास पुन्हा तीन महिन्यांनी दुसरी संधी देवुन परिक्षा घेण्यात येईल त्यामध्ये त्यांना उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील अन्यथा सदर एक वर्ष तीन महिने कालावधीमध्ये उत्तीर्ण न झालेल्या उमेदवारास या सेवेतून कमी करण्यांत येवून प्रशिक्षणाचा खर्च उमेदवाराकडून वसुल करण्यांत येईल.

१३. उपरोक्त पदांवर नियुक्त केलेल्या उमेदवाराचे प्रशिक्षण कालावधीतील प्रशासकीय काम व शिस्त याबाबत प्रत्येक तीन महिन्यानंतर संचालक/पोलीस अधीक्षक(अंमु) व मुख्य शासकीय दस्तऐवज परिक्षक हे मूल्यमापन करतील. सदर मूल्यमापानात त्याला / तिला पात्र ठरणे आवश्यक राहील.

१४.चारित्र्य व पुर्व आयुष्य पडताळणी :- उपरोक्त पदावर निवड झालेल्या उमेदवाराचे चारित्र्य आणि पुर्व आयुष्य पडताळणी अहवाल प्राप्त झाल्याशिवाय उमेदवारास नियुक्ती देण्यात येणार नाही. किंवा प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येणार नाही. ज्या उमेदवाराविरुध्द खटला प्रलबिंत आहे अशा उमेदवाराना नियुक्ती देण्यात येणार नाही.

१५. निवड झालेल्या उमेदवारांची महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्व साधारण शर्ती) नियम १९८१ मधील तरतूदीनुसार शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशास अनुसरुन वैद्यकीय चाचणी करण्यात येईल. वैद्यकीय चाचणीत सुदृढ शरीरयष्टी व निर्दोष दृष्टी आणि इतर चाचण्याचा सामावेश असेल. निवड झालेले जे उमेदवार सदर चाचण्यामध्ये अपात्र ठरतील, त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही.

१६. आरक्षण :- उक्त पदाकरिता मागासवर्गीय, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, महिला, खेळाडु, अंशकालीन पदवीधर यांचे साठी शासनाने वेळोवेळी विहित केलेले आरक्षण लागु राहील. मागस प्रवर्गातील उमेदवाराना व सदर घटकातील उमेदवाराना सर्व पात्रता निकष पुर्ण करणे आवश्यक राहील.

Scanned by CamScanner

१७. सदर पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारास त्या संबंधाच्या नियमानुसार विहित केलेली हिंदी व मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण केलेली नसेल अथवा ती उत्तीर्ण होण्यापासुन सुट मिळाली नसल्यास सदर परिक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

१८.सदर पदावर निवड झालेल्या उमेदवारास महाराष्ट्र राज्यात कोठेही नियुक्तीस/बदलीस पात्र राहील. निवड झालेल्या उमेदवारास संबंधीत पदाचे नियमानुसार वेतन व भत्ते अनुज्ञेय असतील.

१९. सदर पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) (शिस्त व अपील) १९८१ आणि राज्य शासनाने व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वेळोवेळी विहित केलेले अन्य नियम किंवा आदेश लागु राहतील.

२०. जाहिरातीमधील सुचना / मजकूर पूर्णपणे वाचुनच अर्ज करण्याची दक्षता उमेदवारांनी स्वत: घ्यावी. आवेदन अर्जातील चुकांना उमेदवार स्वत: जबाबदार राहतील.

२१. उमेदवाने ऑन लाईन अर्ज करत असताना दिलेले भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आय.डी भरती संपेपर्यंत बदलु नयेत. तसेच उमेदवारांना भरती संबधी सुचना वेळोवेळी नमूद संकेत स्थळांवर उपलब्ध करुन दिल्या जातील. त्याप्रमाणे उमेदवाराने सुचनाचे पालन करणे बंधनकारक राहील.

२२. सदर भरती प्रक्रियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

२३. भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी अथवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. निवडी संबंधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास संबंधीत उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या अधारे पार पाडली जाणार असल्याने उमेदवाराने कोणत्याही प्रलोभनला बळी पडु नये.

२४.भरती प्रक्रियेदरम्यान जर एखाद्या उमेदवाराने सादर केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळुन आल्यास अशा उमेदवारांचे अर्ज भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात रदद करण्यांत येईल. व सबंधीत उमेदवार दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील. तसेच चुकीच्या माहिच्या अधारे नियुक्ती झालेल्या उमेदवारास तात्काळ सेवेतुन काढुन टाकण्यास पात्र राहील व ते भा.द.वि. कलम १९९ व २०० (२) प्रमाणे कार्यवाईस पात्र राहील.

२५. भरती प्रक्रियेअंतर्गत पदांची सख्या, प्रवर्गनिहाय पदसंख्या, सदर भरती प्रक्रियेमध्ये अंशत : बदल करणे, स्थगित करणे, परिक्षा कोणत्याही टप्प्यावर रदद करणे, याबाबतचे सर्व अधिकार भरती प्रधिकारी यांना राहतील.

२६. सदर भरतीच्या नियम निकषांमध्ये भरती पुर्ण होईपर्यंत शासन अधिसुचना/निर्णय/परिपत्रक/ पत्रानुसार बदल झाल्यास त्या त्या प्रमाणे भरती कार्यवाही करण्यात येईल, ती सर्वावर बंधनकारक राहील.

२७. १. जन्मदिनांकासाठी स्थनिक स्वराज्य संस्थेने दिलेला जन्म नोंद दाखला/ शालांत परिक्षा प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवारांनी सादर करावे.

२. आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवाराना त्या संदर्भातील सक्षम अधिका-यानी दिलेले जात प्रमाणपत्र उपलबध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची सांक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

३. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्सास, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र बीसीसी-२०११/प्र.क्र१०६४/२०११/१६-ब दिनांक १२.१२.२०११ मधील तरतुदीनुसार याचिका क्रमांक २१३६/२०११ व अन्य याचिकावर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५/०८/२०११ रोजी दिलेल्या आदेशा विरोधात मा. सर्वोच्य न्यायलय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती आदेश निर्गमित केलेल्या दिनांकापासून ०६ महिन्याच्या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांची नियुक्ती पूर्वलक्षी प्रभावाने रदद करण्यात येईल.

४. अंशकालीन उमेदवाराचे बाबतीत त्याचे अंशकालीन सेवेची अनुभवाची नोंद रोजगार व स्वयंरोजगार व मार्गदर्शन केंद्रामध्ये केलीली असली पाहिजे. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचा-यांनी त्यांच्या अनुभावाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी बाबतची कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर करावी लागतील.

२८. सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसुचना क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०१०/१२ दिनांक २८/०३/२००५ व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक ०१/०७/२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान मुलांचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये दिनांक २८/०३/२००५ रोजी हयात असलेल्या व त्या नंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या या बाबत लहान कुटुंब असलेचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

२९. जाहिरातीतील पदांची भरती बाबत अध्यक्ष, भरती समिती यांचा निर्णय अंतिम असेल, त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार वैयक्तिक पातळीवर कोणाशीही करुन नयेत याची उमेदवारांनी नोद घ्यावी.

३०. उमेदवाराने अर्ज केला अथवा अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. यांची नोंद उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३१.मागासवर्गीय उमेदवारांनी, ऑन लाईन अर्ज सादर करण्यापुर्वी कोणत्या प्रवर्गातुन अर्ज भरावयाचा आहे हे निश्चित करुनच ऑनलाईन अर्जात तशी माहिती नोंद करावी. याबाबत, उमेदवारांकडुन नंतर कोणतेही अभिवेदन अथवा तक्रार घेतली जाणार नाही.

३२. आवेदन अर्ज एकदा Submit केलेनंतर त्यात पुन्हा बदल करता येणार नाही.

३३.भरती करणेबाबत कोणीही पैशाची अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधित उमेदवारने त्याबाबतची माहिती पोलीस अधिक्षक/ पोलीस उप आयुक्त लाचलुचपत प्रतिबंध विभांग, पुणे यांचे कार्यालयातील दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२१३४ व ०२०-२६१२८८९१ तसेच टोल - फ्री क्रमांक १८०० २२२ ०२१ या दुरध्वनी क्रमांकावर त्वरीत संपर्क साधुन तक्रार करावी.

३४.उमेदवाराना काही अडचणी भासल्यास महाऑनलाईल दुरध्वनी क्रमांक ०२२-६१३१४०० या हेल्प लाईन नंबर वर संपर्क साधावा.

Scanned by CamScanner

**महत्त्वाची टिप :-**

- उमेदवाराला ऑन लाईन परिक्षा उत्तीर्ण व इतर सर्व पात्रता निकष पुर्ण करणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती उपरोक्त नमुद संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

- प्रस्तुत पदांकरिता फक्त अधिकृत संकेतस्थळावरुन विहित पध्दतीने भरण्यात आलेले ऑन लाईन अर्जच स्वीकारले जातील.

- भरती प्रक्रियेमध्ये सहभागी होणा-या उमेदवारास कोणतीही इजा/ नुकसान झाल्यास त्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहील.

- भरती प्रक्रियेअंतर्गत पंदाची संख्या, प्रवर्गनिहाय पदसंख्या, सदर भरती प्रक्रियेमध्ये अंशत बदल करणे स्थगित करणे, कोणत्याही टप्पयावर रद करणे याबाबतचा अंतिम निर्णय याबाबतचे सर्व अधिकार भरती प्राधिकारी यांना राहतील.

- भरतीबाबत काही विवाद निर्माण झाल्यास, त्याबाबत अंतिम निर्णय हा भरती प्राधिकारी यांचा राहील.

- दोन्ही परिक्षा एकाच वेळेस एकाच परिक्षा केंद्रावर घेण्यात येणार असल्याने अर्जदाराला दोन्ही पदांकरिता अर्ज करणेची मुभा राहणार नाही.

(श्रीकांत तरवडे)
पोलीस उपमहानिरीक्षक(प्रशासन),
गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे.

17/10 18/10 17/10

Scanned by CamScanner